समंस.प्र.क. ११५/२०१६
संताजी वि. संजय
नि.क. : २८

साक्षीदाराचे नाव:- अशोक नामदेवराव खंते
वय :- ४०
व्यवसाय :- मॅनेजर, संताजी केडीट सोसायटी नरखेड
राहणार :- नरखेड, ता. नरखेड, जि. नागपुर

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क. ०१ चा पुढील सरतपास फिर्यादीचे विद्वान विधीज्ञ श्री खंते यांच्या मार्फत शपथेवर सुरु:-</u>**

मी शपथेवर खरे सांगतो की,

**१.** आता मला माझा साक्ष प्रतिज्ञालेख दाखविण्याल आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन, माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. साक्ष प्रतिज्ञालेखावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. साक्ष प्रतिज्ञा लेख **नि.क. २८** वर आहे.

**२.** आता मला अभिलेखावर दाखल असलेला मुळ धनादेश दिनांक २८.०१.२०१६ कमांक ०५२४०६ दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे, त्याने ती माझेसमक्ष केली आहे. सदरील धनादेशाला **नि.क. ३७** देण्यात येते.

**३.** आता मला अभिलेखावर दाखल असलेली चेक डिपॉझीट स्लिपची मुळ प्रत दाखविण्यात आली, त्यावर बॅकेच्या अधिका-याची सही व शिक्का असुन ती तीच असुन तिला **नि.क. ३८** देण्यात येते.

४. आता मला अभिलेखावर दाखल बॅक रिटर्न मेमो दाखविण्यात आला. त्यावर बॅकेच्या अधिका-याची सही आहे. याला **नि.क. ३९** देण्यात येते. आता मला बॅक ऑफ महाराष्ट्ने दि. २८.०१.२०१६ रोजीचा ॲडव्हाईस दिला होता, त्याची प्रत दाखविण्यात आली, त्यावर बॅकेची सही व शिक्का आहे, त्यास **नि.क ४०** देण्यात येते.

**५.** आता मला अभिलेखावर दाखल असलेली नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. सदरची नोटीस माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे पाठविली होती, त्यावर माझे वकीलांची सही असुन नोटीसच्या स्थळप्रतीला **नि.क.४१** देण्यात येते.

**५.** पोस्टाच्या पावतीला **नि.क.४२** व पोस्टाच्या पोचपावतीला **नि.क. ४३** देण्यात येते.

**६.** आता मला अभिलेखावर दाखल असलेली दि. १९.०१.२०११ रोजीच्या ठरावाची सत्यप्रत दाखविण्यात आली, सदर ठरावामध्ये संचालक मंडळाच्या सदस्यांनी सहया करुन ठराव पारीत केला होता. ठरावाच्या सत्यप्रतीला **नि.क. ४४** देण्यात येते.

७. आता मला आरोपीच्या बॅक खात्याचा उतारा दाखविण्यात आला, तो तोच असुन त्याला **नि.क. ४५** देण्यात येते. तसेच सोबत असलेल्या ६५-बी खालील प्रमाणपत्राला **नि.क. ४६** देण्यात येते.

८. आता मला अभिलेखावर दाखल असलेली आरोपीने कर्ज मागण्याच्या अर्जाची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यावर आरोपी, जमानतदार व बॅकेच्या पदाधिका-यांच्या सहया आहे. (कराराची मुळप्रत तक्रारकर्त्यानी दाखल केली नाही त्याचे कारण असे की, त्यांना मुळप्रत ऑडीटकरीता आवश्यक होती, आज रोजी तक्रारकर्त्यानी सत्यप्रत दाखल केली आहे.) कराराच्या सत्यप्रतीला **नि.क. ४७** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपीचे विदवान विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे तर्फे :</u>**

९. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणाच्या कर्जापुर्वी देखील आरोपीने आमचे संस्थेकडुन कर्ज घेतले होते. प्रस्तुत प्रकरणाच्या कर्जापुर्वी आरोपीने आमचेकडुन कर्ज घेतले होते ते मला आठवत नाही. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळेस आरोपीने आम्हाला २ कोरे चेक दिले होते.

१०. हे म्हणने खरे आहे की, माझे प्रतिज्ञापत्र व नोटीसमध्ये इंग्रजी शब्दामध्ये 'Legally Enforceably debt' असे नमुद नाही. हे म्हणने खरे आहे की, केस चालविण्याकरीता मला संस्थेने ठराव पारीत करुन अधिकार दिलेले आहे. हे म्हणने खरे आहे की, आमच्या संस्थेच्या प्रत्येक व्यवहाराचा लेखाजोगा असतो. हे म्हणने खरे नाही की, दि. २८.०१.२०१६ पावेतो आरोपीकडुन आम्हाला कोणतेही कर्ज घेणे नव्हते. हे म्हणने खरे आहे की, आमची संस्था व्याज आकारणी रिजर्व बॅक ऑफ इंडीया नुसार करत नाही. हे म्हणने खरे नाही की, नि.क्र. ३७ ते ४१ वर मी खोटे कागदपत्रे दाखल केले आहे. हे म्हणने खरे आहे की, कर्ज देण्याकरीता आधी आमची सोसायटी ठराव पारीत करते.

**<u>उलटतपास आरोपीचे विदवान विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकुब :</u>**

वा.दा.ब.अ.क.के.

( एन.बी.राठोड )
प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी
नरखेड.
दि. १३.०२.२०२०

समक्ष,

( एन.बी.राठोड )
प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी
नरखेड.
दि. १३.०२.२०२०